जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 5 MAY 2016

# 'रुसा'च्या समितीची विद्यापीठाला भेट

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या समितीने (रुसा) बुधवारी भेट दिली. दिवसभर समितीने विविध विभागांची पाहणी करुन निधीच्या वापराबाबत काही सूचना केल्या.

'रुसा'अंतर्गत विद्यापीठाला २० कोटींचे अनुदान मंजूर झाले आहे. पहिल्या टप्प्यात विद्यापीठाला यापैकी पाच कोटी रुपये मिळाले आहेत. दुसऱ्या टप्प्यांतील निधी देण्याच्या अनुषंगाने 'रुसा'च्या सहा सदस्यांच्या समितीने बुधवारी विद्यापीठाला भेट दिली. दिवसभरात समितीने विद्यापीठातील नावीन्यपूर्ण उपक्रम, संशोधन, प्रशासकीय कामकाज, आदींची माहिती घेतली. यात विद्यापीठातील काही अधिविभागांच्या प्रमुखांनी, समन्वयकांनी संबंधित माहितीचे त्यांच्यासमोर सादरीकरण केले. यानंतर नॅनो टेक्नॉलॉजी, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि लीड बोटॅनिकल गार्डन, आदींची पाहणी केली. विद्यापीठाच्या कामगिरीवर समितीने समाधान व्यक्त केले. समितीने कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याशी विद्यापीठातील संशोधन, प्रकल्पांबाबत चर्चा केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, 'रुसा'च्या समन्वयक समितीचे सदस्य डॉ. डी. टी. शिर्के, आर. के. कामत, संजय कुबल, जी. एस. कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

दरम्यान, प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, 'रुसा'च्या समितीने विद्यापीठाच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

पुण्यनगरी

5 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निमशहरीमध्ये डॉ. घाळी, शिवराज कॉलेज प्रथम

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :**

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात डॉ. घाळी कॉलेजने शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत विज्ञान विद्याशाखेतून निमशहरी या गटातील प्रथम क्रमांक मिळवला. तर शिवराज कॉलेजने कला शाखेत निमशहरी गटामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. शिवाजी विद्यापीठाने गुणवत्ता शिष्यवृत्त गुणगौरव समारंभ राजे रामराव महाविद्यालय जत, सांगली येथे आयोजित केला होता. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते गुणवत्ता प्रशस्तीपत्र घाळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांना व शिवराज कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे यांना देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभयकुमार साळुंखे होते.



**जत : शिवराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे यांना प्रशस्तीपत्र देताना डॉ. देवानंद शिंदे. सोबत मान्यवर.**

यावेळी डी. आर. मोरे, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. यावेळी डॉ. घाळी कॉलेजचे डॉ. एम. डी. पुजारी, प्रा. एन. ए. स्वामी, प्रा. एन. बी. मासाळ, प्रा. पी. आर. बिराजदार, डॉ. एस. ए. मस्ती, प्रा. महेश वंडकर, प्रा. खानापूरे तर शिवराज कॉलेजचे प्रा. अनिल कुराडे, डॉ. डी. आर. खटके, डॉ. राजेंद्र गुंडे, डॉ. ए. बी. कुंभार, डॉ. आण्णासाहेब हरदारे, प्रशांत शेंडे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. या यशाबद्दल शिवराज व डॉ. घाळी कॉलेजच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.